महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मादम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक ,
मंत्रालय , मुंबई -४०० ००३२.

जाहिरात क्रमांक/०३/२०१९-२०/विशेष शिष्यवृत्ती योजना/ दिनांक- ०१/०७/२०१९

## विशेष शिष्यवृत्ती योजना

केंद्रीय लोक सेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय प्रशासकीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे याकरीता गुणवत्ताधारीत विशेष शिष्यवृत्ती योजना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग , मंत्रालय , मुंबई तर्फे सुरु करण्यात आली आहे.

दिल्लीस्थित खाजगी प्रशिक्षण संस्थेमध्ये UPSC, CIVIL SERVICES EXAMINATION-2020 परीक्षेच्या तयारीकरीता महाराष्ट्रातील उमेदवारांना शासनामार्फत अर्थ सहाय्य करुन ( श्रीराम आयएएस) SRIRAM' S IAS , 22-B, Pusa Road , Bada Bazar Marg, Old Rajender Nagar, New Delhi-110060. या दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमध्ये योजनेच्या भाग-१ नागरी सेवा परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरीता प्रवेश देण्यासाठी Online अर्ज मागविण्यात येत आहेत. निवड केलेल्या कोर्सची माहिती पुढील प्रमाणे आहे.

SRIRAM' S IAS ( Prelim-cum- Main Integrated Course 2020 )

| SR NO. | Date of Commencement | Duration(Approx) | Subject |
|---|---|---|---|
| Batch 2 | 01st August | 10 Months | General Studies ( Prelim and Mains ), Essay, CSAT and Optionals Public Admi. Anthropology ,Political Sc., Sociology |

- **सवलती** : १) शासनाने निवड केलेल्या दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थाकडून प्रवेशित उमेदवार व त्यांच्या प्रशिक्षणापोटी भरावयाचे शुल्क शासनामार्फत भरण्यात येईल.
- **निर्वाह भत्ता** :- सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला दिल्ली येथील त्यांच्या १० महिन्याच्या प्रशिक्षणाच्या वास्तवाच्या कालावधीसाठी रु.१००००/- प्रति माहे प्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येईल.

- **अटी::-** १) सदर शिष्यवृत्तीकरीता दिल्लीस्थित Sriramias या संस्थेची खाजगी प्रशिक्षण करीता शासनाने निवड केली आहे.

  २) शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतल्यानंतर केंद्रीय लोक सेवा आयोगाची संबधीत परीक्षा देणे उमेदवारास बंधनकारक असेल. अन्यथा त्या शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम एकरक्कमी शासनास परत करण्यात येईल अशा आशयाचे बंधपत्र देणे आवश्यक राहिल.

- **निकष** :-सदर शिष्यवृत्ती योजना अंतर्गत प्रवेशासाठी खालील निकषांची पूर्तता करणे आवश्यक राहिल.

१) सदर उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा

२) अर्जकरत्या उमेदवाराचे व त्याच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रु. १०.०० लाखाच्या मर्यादेत असावे.

३) UPSC ची मागील तीन वर्षामध्ये किमान एक वेळा नागरी सेवा मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरी पर्यंत पोहोचलेल्या तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न झालेला उमेदवार सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकेल.

४) उमेदवाराने अर्जासह पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, महाराष्ट्राचा रहिवासी दाखला (Domicile of Maharashtra Certificate), UPSC ची गुणपत्रिका, इ. कागदपत्रे सादर करावीत.

सदर शिष्यवृत्तीचा अर्ज राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई च्या www.siac.org.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**Online पध्दतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी व इतर सूचना:**

- Online द्वारे अर्ज करण्याचा कालावधी दिनांक ०१.०७.२०१९ ते दि.२०.०७.२०१९
- Online द्वारे अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक २०.०७.२०१९.
- Online द्वारे प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी दिनांक २२.०७.२०१९ ते २४.०७.२०१९
- दिनांक २५.०७.२०१९ रोजी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिध्द करणे.
- दिनांक २६.०७.२०१९ ते दि.३१.०७.२०१९ या कालावधीत दिल्ली येथील श्रीराम आय.ए.एस येथे प्रत्यक्ष प्रवेश घेणे. सदरच्या कालावधीत प्रवेश न घेतल्यास आपले नांव प्रवेश यादीमधून आपोआप रद्द होईल.
- दिनांक ०१.०८.२०१९ पासून प्रशिक्षण सत्रास सुरवात होईल.

सही/-

सदस्य सचिव

विशेष शिष्यवृत्ती योजना